संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# समाजातला अंधार दूर करणारी क्रांतीज्योत

**ऐन** तारूण्यामध्ये सामाजिक सुधारणांची किंवा प्रबोधनाची मशाल हाती घेऊन ज्यांनी समाजाला केवळ जागृत केले नाही तर भावी पिढ्यांना विचारांचा चिरंतन वसा सोपवला. एका छोट्याशा ज्योतीने प्रज्वलित केलेली क्रांतीची ही मशाल आजही अनेकांना किंबहुना सर्वच समाजाला प्रेरणा देत आहे. त्या ज्योतीचे नाव म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले. एकोणिसाव्या शतकामध्ये जन्माला आलेले आणि केवळ वयाच्या पंचवीसाव्या वर्षी आपल्या कार्याची दखल ब्रिटीशांनाही घ्यायला लावणारे ज्योतिबा म्हणजे विचार आणि कृतीचा खरोखरच महामेरू ठरतात. आजच्या त्यांच्या जन्मदिवशी त्यांना अभिवादन करीत असताना त्यांनी जात, पात, स्पृष्य , अस्पृष्य आणि धार्मिक पाखंडाला नाकारण्याचे त्या काळात हे धैर्य दाखवले हे सर्वात महत्वाचे ठरते. स्वतःचे घर मुलींच्या शिक्षणासाठी उपलब्ध करून देण्यापासून ते आपल्या घरातील पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला करण्यापर्यंतची त्यांची कार्ये सांगितली जातात. परंतु समाजातल्या अनिष्ट प्रवृत्ती किंवा भेद कशामुळे निर्माण झाले. याचे चिंतन करताना ज्योतिबांनी शिक्षणाचा अभाव हे त्याचे प्रमुख कारण शोधले होते. त्यांचा प्रत्येक अन्यायाला विरोध असायचाच. पण सत्य पटवून देण्यासाठी संघर्ष करण्याची त्यांची तयारी असायची. कोणतेही सत्य हे कटू असते. ते समाजाला समजावून सांगावे लागते आणि हे सांगण्याकरीता समाज संघटितही करावा लागतो. म्हणूनच त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला होता. हा सत्यशोधक समाज स्थापन करण्यापूर्वी त्यांनी गुलामगिरी नावाचा एक ग्रंथही दिला होता. कारण वैयक्तिक पातळीवर समाजप्रबोधन होऊ शकत नाही. किंवा समाजपरिवर्तनाचा रथ गतीमान करण्यासाठी लोकसमुहाला सत्यावर आधारित सिध्दांत पटवून द्यावे लागतात. त्या काळामध्ये सामाजिक आणि मानसिक गुलामगिरीत खितपत पडलेल्या वर्गाला संघटित करण्याशिवाय पर्याय नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. या सत्यशोधक समाजाचे सभासद होणाऱ्यांना जी शपथ दिली जायची. ती जर नीट वाचली तर त्यातून त्यांची दूरदृष्टी आणि सामाजिक चिंतन किती वैशिष्ट्यपूर्ण होते हे लक्षात येते.

### सत्यशोधक समाज आणि प्रतिज्ञा

कोणतीही सामाजिक चळवळ सुरु करण्यापूर्वी त्याची ध्येयधोरणे नक्की झाली पाहिजेत आणि त्या ध्येय धोरणांना अनुसरून संघटनेच्या सभासदांचे वर्तनही राहिले पाहिजे. म्हणूनच सत्यशोधक समाजाच्या सदस्यांसाठी तयार केलेल्या शपथेमध्ये ते म्हणतात. पृथ्वीवरची सर्व माणसे ही एकाच देवाची लेकरे असल्याने ती सर्व जण माझी भावंडे आहेत. अशाच भावनेने मी त्यांच्याशी सर्वबाबतीत वर्तन करीन, परमेश्वराची पूजा प्रार्थना करताना अगर ध्यानधारणा करताना मी कोणत्याही प्रकारच्या मध्यस्थाची गरज ठेवणार नाही इतरांनीही तसेच करावे. असा मी प्रयत्न करेन. मी माझ्या मुलामुलींना सुशिक्षित करीन. मी राज्यनिष्ठेने वागेन. अशा प्रकारची शपथ ज्यावेळी सदस्यांना दिली जात होती त्यावेळी मी माझ्या मुलामुलींना सुशिक्षित करीन. हे वाक्य अतिशय महत्वाचे ठरते. कारण केवळ धर्माच्या नावाखाली नाकारण्यात आलेल्या सोयीसुविधांपासून समाजाला वंचित ठेवले गेले होते. आपल्या कोणत्याही प्रकारच्या विकासामध्ये मध्यस्थांचा अडथळा असता कामा नये याची जाणीव जेव्हा ज्योतिबा करून देतात त्यावेळी समाजातल्या महत्वाच्या गोष्टीकडे ते लक्ष देतात. कोणताही हक्क किंवा अधिकार प्राप्त करताना तो विचारांची तर्कशुध्द मांडणी करूनच मिळवावा. ही गोष्ट त्यांनी या शपथेच्या माध्यमातून समाजमनावर बिंबवलेली दिसून येते. शिक्षणासाठी प्रेरणा आणि व्यसनांचा त्याग यासाठी त्यांनी या सत्यशोधक समाजाच्या व्यासपीठाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला. त्या काळामध्ये शेतीवर गुजराण करणारा बराच मोठा वर्ग असल्यामुळे या शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचे फळ मिळवून देता यावे यासाठीसुध्दा त्यांनी फार मूलगामी प्रयत्न पाहायला मिळतात. स्वाभाविकपणे त्यांनी १८७६ सालच्या महाराष्ट्रातील भयानक अशा दुष्काळाच्या काळात दुष्काळग्रस्तांविषयी सरकारला जागे करण्याचे काम केले होते. शेतकऱ्यांचा आसूड हे पुस्तक तर सरकारच्या बेजबाबदारपणावर कठोर टीका करणारे तर होतेच. परंतु व्यापारीदेखील शेतकऱ्यांची कशी अडवणुक करतात खोटी मापे वापरून शेतकऱ्यांना लुबाडतात हेदेखील त्यांनी कठोरपणे या पुस्तक ग्रंथातून मांडले होते. आज आपण जे कृषी प्रदर्शने बघतो त्या विचारांची मुहूर्तमेढ ज्योतिबांनी केली होती. श्रावण महिन्यात शेतकऱ्यांसाठी प्रदर्शने भरवावीत. अश्विन महिन्यामध्ये जो शेतकरी उत्तम पीक घेतो त्याचा बक्षिस देऊन गौरव करावा. यावरून त्यांच्या दूरदृष्टीची कल्पना येते.

### कार्याचे जागरण हवे

ज्योतिबांच्या कार्याचा ठेवा काय याचा जर आपण विचार केला तर देश आणि समाजाला समानतेची आणि शिक्षणाची गरज असल्याचे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून मांडून दाखवलेच. परंतु त्या काळाचा विचार करताना क्षुद्र, शेतकरी आणि शिक्षण या तीन गोष्टींना त्यांनी सर्वाधिक महत्त्व दिल्याचे लक्षात येते. सत्याचा स्वीकार करण्याकरीता सरकारची मानसिकता तयार झाली पाहिजेत्त आणि ही मानसिकता केवळ भाषणांनी तयार होणार नाही तर प्रत्यक्ष उपक्रम राबवावे लागतील म्हणूनच त्यांनी शेतकऱ्यांचा संप घडवून आणण्यापासून ते मुंबईतल्या गिरणी कामगारांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्यासाठी मेळावा घेण्यापर्यंतची अनेक कामे केली. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्यांना गुरु मानले त्यांना ११ मे १८८८ मध्ये मुंबईतल्या मांडवी कोळीवाड्यात महात्मा ही पदवी अर्पण केली गेली होती. बडोद्याचे नरेश सयाजीराव गायकवाडांनी त्यांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने त्यांना हिदुस्तानचे तारणहार या शब्दात त्यांचा गौरव केला गेला होता. त्यांच्या सर्व कार्यात सहकार्य करणाऱ्या सावित्रीबाईंनी मुलींच्या शिक्षणासाठी स्वतःला वाहून तर घेतलेच शिवाय बालविवाहांना विरोध, विधवांच्या केशवपनाला विरोध अशा चळवळींमध्येही सक्रीय पुढाकार घेतला होता. कोणतीही सामाजिक सुधारणा ही कृतीशील उपक्रमांनीच प्रत्यक्षात उतरते. ज्योतिबांनी आधी केले मग लोकांना सांगितले. त्यांचा हा विचारांचा वसा नव्या पिढीपर्यंत पोहचवायचा असेल तर त्यांनी केलेल्या कार्याचे सतत जागरण झाले पाहिजे.